**नि. क्र. ११९ च्या आदेशावरुन वादीतर्फे साक्षीदार क्र. २.**

**मी शपथेवर कथन करतो की,**

**नाव —** सदाशिव ईश्वराप्पा हांजी.

**वय** - ८४ वर्ष, **व्यवसाय** - सेवानिवृत्त,

राहणार.– टिळक पथ, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

**वादीतर्फे सरतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**१.** मी सरकारी वकील म्हणून काम केलेले असून कायमस्वरुपी गडहिंग्लज येथे राहण्यास आहे. ईश्वराप्पा सिदबसाप्पा हांजी माझे वडिल होते. ते दस्तलेखनाचे काम करत होते. मी त्यांना ६५ वर्षांपूर्वी एकदा ते दोनदा दस्त लिहिताना पाहिले होते. मी माझ्या वडिलांचे हस्ताक्षर दाखविल्यास ओळखू शकतो.

२. आता मला दाखविलेल्या नि. क्र. १२७ व १२८ वरील दस्तातील हस्ताक्षर माझ्या वडिलांचे आहे किंवा नाही याबाबत आता सांगू शकत नाही. त्यावरती दस्तूर म्हणून माझ्या वडिलांचे नाव आहे. मला माझे वडिल दस्तलेखनाचा परवाना घेऊन काम करत असल्याची माहिती नाही.

३. माझ्या वडिलांच्या निधनाला ५५ वर्षे झाली आहेत. त्यांच्या मृत्यूसमयी माझे वय २५ ते २६ वर्षे होते. माझे वडिल घरातून दस्तलेखनाचे काम करत होते. माझे दोन्ही मोठे भाऊ आज रोजी हयात नाहीत. माझ्याकडे आमच्या वडिलांनी लिहिलेले दस्त नाहीत. गडहिंग्लज येथे माझ्या वडिलांच्या नावाची दस्तलेखन करणारी दुसरी व्यक्ती नाही.

**साक्षीदार वादीपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे वादीतर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदारास फितुर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

४. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. १२७ व १२८ वरील दस्तातील हस्ताक्षर माझ्या वडिलांचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात जबाब द्यावा लागेल यामुळे सदर हस्ताक्षर माझ्या वडिलांचे आहे किंवा नाही याबाबत सांगू शकत नसल्याचे कथन करत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी क्र. ३ व ४ तर्फे उलटतपास – श्री. एस. आर. पोवार वकील–**

**५.** उलट तपास नाकारला.

**<u>प्रतिवादी क्र. १० तर्फे उलटतपास – श्री. यू. जी. परुळेकर वकील.</u>**

**६.** उलट तपास नाकारला.

**<u>इतर प्रतिवादींतर्फे – एकतर्फा.</u>**

**फेर तपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – २६.११.२०२४. (आर. पी. थोरे)

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.